maharashtratimes.com | www.mtonline.in

# महाराष्ट्र टाइम्स

एकमेव निःपक्ष वृत्तपत्र

औरंगाबाद, बुधवार, २ डिसेंबर २०१५

शहर आवृत्ती ◆ रुपये २.५०

औरंगाबाद Times



## बाल कामगारांची सहल

आझाद अली शाह शिक्षण संस्थेतर्फे पहेगाव येथे राष्ट्रीय बाल कामगार प्रकल्प शाळा चालवण्यात येते. या शाळेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल काढण्यात आली. एमजीएमच्या दूध डेअरीला भेट देऊन विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती करून घेतली. परिसरातील निसर्गरम्य वातावरणात चित्रकला स्पर्धेतही विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. त्यानंतर सभा घेण्यात आली. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा सुरैय्या खान, प्रशासकीय अधिकारी खान साजेद पाशा यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी निर्भीडपणे मनोगत व्यक्त केले. आयशा खान यांनी सूत्रसंचालन केले. माया आवाड यांनी आभार मानले. सहलीचे नियोजन रिजवाना मन्सुरी, शेख तमन्ना, अंजू शर्मा, अफरीन शेख, हाफिज तोहीद, खान इसाद यांनी केले.